शुक्रवार
२०
मार्च २०२६

वर्ष १९ वे
अंक - ६९
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252
- पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

- रामजान ईदच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !







दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 34, 750/-
20 कॅरेट मणी = 1, 22, 505/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 10, 245/-
16 कॅरेट मुरणी = 98, 000/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ६९ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । २०/०३/२०२६ । पान - २




# ऑफिसबॉयचा भयानक कट, महिलांच्या अब्रूचा सौदा

## अशोक खरातच्या वासनांधतेचा चेहरा कसा आला जगासमोर?



**तथाकथित कॅप्टन खरातचा काळा चेहरा आणखी उघड होत असून त्याच्याकडे शंभर पेक्षा जास्त व्हिडीओ,पिस्तुल, काडतुसे मिळून आली आहे. नाशिकसह विविध ठिकाणी तीन गुन्हे दाखल झाले आहे. अनेक कागदपत्र तपास पथकाच्या हाती लागत आहे. ८ लाख रोकड, तीस एकर जमीन, सोनेनाणे यासह मोठा खजिना देखील सापडला आहे. गुन्हा दाखल होण्याअगोदर अनेक राजकीय नेते बाबांचे भक्त होते. मात्र हेच नेते आता अंग झटकून या भोंदूवर कायदेशीर कारवाई होईल असे म्हणून मोकळे होत आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमध्ये तथाकथित अंकशास्त्रज्ञ आणि राजकीय वर्तुळात वावर असलेल्या कॅप्टन अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात अटक झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले असून, या संपूर्ण दुष्कृत्याचा खरा मास्टरमाईंड कॅप्टन खरातचा 'खास' व ऑफिसबॉय संशयित नीरज जाधव असल्याचे समोर आले आहे. अशोक खरातने महिलांचे लैंगिक शोषण केले. मात्र त्या शोषणाचे भांडवल करून ५८ महिलांची लाज विकण्याचा डाव नीरजने रचल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून राज्य शासनाने तपासासाठी 'एसआयटी' स्थापन केली आहे. गुरुवारी (दि.१९) सकाळी आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांनी नाशिकमध्ये दाखल होत अशोक खरातची दोन तास कसून चौकशी केली आहे. महिलांवरील अत्याचाराचे फुटेज चोरले नाशिकच्या कॅनडा कॉर्नर येथील 'ओजस प्रॉपर्टीज' या कार्यालयात स्वयंघोषित कॅप्टन अशोक खरातने अनेक महिलांवर केलेल्या अत्याचाराचे व्हिडिओ, मॉर्फ व्हिडिओ, फोटो व पुरावे सीसीटीव्हीच्या रूपाने जतन केले होते. खरातचा विश्वासू असलेला नीरज जाधव याने डिसेंबर २०२५ साली खरातच्या नकळत कार्यालयातून या ५८ महिलांवरील अत्याचाराचे फुटेज चोरले. नीरजच्या मनात पैशांची हाव निर्माण झाली. त्याने या व्हिडीओंच्या जोरावर खरातलाच ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केल्याची माहिती समोर येत आहे. नीरज आणि त्याच्या साथीदारांनी या क्लिप्सच्या बदल्यात खरातकडे ५ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली. मात्र खरातने या मागणीला दाद न देता पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप करीत थेट वावी पोलिसांत फिर्याद नोंदविली होती. त्यामुळे नीरजने आपला मोर्चा थेट पीडित महिलांकडे वळवून त्यांच्या अब्रूचा बाजार मांडला. यानंतर नीरज व इतरांनी शिर्डीतील एका २४ वर्षीय विवाहितेचे मॉर्फ फोटो आणि काही व्हिडीओ थेट तिलाच व्हॉट्सअॅपवर पाठवून धमकावले होते. पीडिता मंदिरात दर्शन घेत असताना नीरजसह संशयिताने तिला गाठून व्हिडीओ दाखविले. ती घाबरली व तिने ही बाब खरातला सांगितली. पण खरातने स्वतःला वाचवण्यासाठी तिलाच पोलिसात जाण्यास सांगितले. खरातकडून पैसे मिळण्याची आशा मावळताच नीरजने सिडकोतील २८ वर्षीय विवाहितेचा व्हिडीओ तिच्या मेहुण्याला पाठविला. नीरजचा हाच मास्टरस्ट्रोक त्याच्यावर आणि खरातवर उलटला. मेहुण्याने धीर दिल्याने या पीडितेने सरकारवाडा पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद देत अशोक खरातच्या वासनांधाचा खरा चेहरा जगासमोर आणला. दरम्यान या प्रकरणाचे धागेदोरे राज्यातील बडे राजकीय नेते, मंत्र्यांशी आणि सेलिब्रिटींशी जोडले गेल्याचे पाहून राज्याचे कायदा व सुव्यवस्था विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. मनोजकुमार शर्मा यांनी तातडीने एसआयटी स्थापन केली आहे.

# रास लाफानवर हल्ला

## जगभरात गॅस संकटाची चिन्हे...



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अंधारात ठेवत इस्त्रायलने इराणच्या जगातील सर्वात मोठ्या गॅस प्रकल्पावर हल्ला केला. यानंतर इराणने सात देशातील गॅस आणि उर्जा व्यवस्थांवर मिसाईली आणि ड्रोन डागत जोरदार प्रत्युत्तर दिले. पुन्हा इस्त्रायलने अशी आगळीक केल्यास जबर किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला. यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यापासून हात झटकताना आपल्याला माहीत नाही अशी प्रतिक्रिया देत इस्त्रायल पुन्हा असे करणार नाही असे सांगितले. दरम्यान आता कतारमधील 'रास लाफान' प्रकल्पावरील हल्ल्याचा जागतिक गॅस किमतींवर मोठा परिणाम होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

पॅरिसमधील 'सेंटर ऑन ग्लोबल एनर्जी पॉलिसी'च्या तज्ज्ञ न-सोफी कॉर्बो यांनी 'अल जजीरा'शी बोलताना सांगितले की, कतारमधील 'रास लाफान' हा जगातील सर्वात मोठा 'लिक्विफाइड नॅचरल गॅस' निर्यात प्रकल्प आहे. या आठवड्यात इराणने केलेल्या हल्ल्यानंतर हा प्रकल्प पुन्हा सुरू होण्यासाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. हल्ल्यामुळे नक्की किती नुकसान झाले आहे हे अद्याप स्पष्ट नसले तरी इतर ठिकाणच्या अशाच घटनांचा अनुभव पाहता हा प्रकल्प दुरुस्त व्हायला अनेक महिने लागू शकतात, असे कॉर्बो यांनी म्हटले आहे. २०२२ मध्ये टेक्सासमधील 'फ्रीपोर्ट एलएनजी' प्रकल्प अशाच एका घटनेमुळे ८ महिने बंद होता. सप्टेंबर २०२० मध्ये नॉर्वेमधील 'स्नोविट' प्रकल्पाला आग लागल्याने तो दीड वर्ष बंद होता. जर परिस्थिती हाताबाहेर गेली, तर कदाचित २०२६ मध्ये रास लाफान प्रकल्प पुन्हा सुरू होणार नाही. याचा अर्थ असा की, २०२६ मधील जागतिक गॅस पुरवठा थेट २०२१ च्या पातळीवर खाली येईल. हा जगासाठी ५ वर्षांचा मोठा फटका असू शकतो. याचे परिणाम संपूर्ण जगावर आणि गॅसच्या किमतींवर प्रचंड मोठे असतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# संगमनेरमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी एक कोटींचा निधी

## अत्याधुनिक कंट्रोल रूम उभारणार - आ. सत्यजीत तांबे



### शहरात सीसीटीव्ही जाळे अधिक मजबूत होणार

युवावार्ता (प्रतिनिधी) - शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच विविध आपत्कालीन परिस्थितींना तोंड देण्यासाठी संगमनेर शहरात अत्याधुनिक आपत्ती व्यवस्थापन कंट्रोल रूम उभारण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीसाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, जिल्हा नियोजन समितीमार्फत हा निधी उपलब्ध झाला आहे.

या निधीतून संगमनेर नगरपालिकेमार्फत आधुनिक सुविधा असलेली आपत्कालीन कंट्रोल रूम उभारण्यात येणार आहे. शहरातील गुन्हेगारी नियंत्रण, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, वाहतूक व्यवस्थापन तसेच पूर किंवा इतर नैसर्गिक आपत्तींच्या वेळी तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यासोबतच शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे अधिक सक्षम करण्यात येणार आहे.

नुकताच नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे व नगरसेवकांचा मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कंट्रोल रूमचा अभ्यास दौरा पार पडला. या दौऱ्यातील अनुभवाच्या आधारे संगमनेरमध्येही त्याच धर्तीवर आधुनिक कंट्रोल रूम उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यापूर्वी २०१९ मध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजीत तांबे यांच्या प्रयत्नांतून संगमनेर शहरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्या माध्यमातून तालुका पातळीवर प्रथमच आधुनिक सीसीटीव्ही जाळे उभे राहिले होते. आता नव्याने मंजूर झालेल्या निधीतून ही यंत्रणा आणखी सक्षम होणार आहे.

दरम्यान, संगमनेर नगरपालिकेने महिला दिनानिमित्त 'रक्षक दल' स्थापन केले असून, या दलाने अल्पावधीतच चांगली कामगिरी बजावली आहे. आगामी काळात हे रक्षक दल सीसीटीव्ही यंत्रणेवरही लक्ष ठेवणार असून, पोलीस यंत्रणा व रक्षक दल यांच्या समन्वयातून शहरातील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत केली जाणार आहे.

नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे म्हणाल्या की, नगरपालिकेच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्थेसह कचरा व पाणी व्यवस्थापन यांसारखी विविध कामे प्राधान्याने राबवली जात आहेत. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. येत्या १ मे रोजी नगरपालिकेच्या पहिल्या १०० दिवसांचा कार्य अहवाल जनतेसमोर सादर केला जाईल.

**संगमनेर शहर अधिक सुरक्षित, सुटसुटीत व सक्षम करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निधीसाठी आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच निधी मंजूर केल्याबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचेही संगमनेर नगरपालिकेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.**

# अतिवृष्टीग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीसाठी दाखले देणेबाबत तहसीलदारांना निवेदन

## भाजपचे मंडलाध्यक्ष गोकुळ दिघे यांची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून प्रशासनाने जोर्वे, कोल्हेवाडी, वाघापूर, रायते, रहिमपूर, मनोली, ओझर (खुर्द), उंबरी, बाळापूर, पानोडी, हंगेवाडी, ओझर (बुद्रुक), कनकापुर, कनोली, पिंपरणे, डिग्रस, मालुंजे, अंभोरे आणि कोळवाडे ही गावे अधिकृतपणे अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित केली आहेत.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. परीक्षा/छावता/३१८ दि. ५ मार्च २०२६ नुसार, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील नोव्हेंबर २०२५ सत्राच्या परीक्षा फीमध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना फी माफी जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मात्र या सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या गावाचा 'अतिवृष्टीग्रस्त' असल्याचा अधिकृत दाखला महाविद्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे सध्या हा दाखला उपलब्ध नसल्यामुळे त्यांना फी माफीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

तालुक्यातील काही ठिकाणी तलाठी हे दाखले देण्यास टाळाटाळ करत असल्याची बाब निदर्शनास आल्याने या पार्श्वभूमीवर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून, संबंधित गावांतील तलाठी यांना तात्काळ आदेश देऊन विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रक्रिया सुलभ व जलद करण्यात यावी, जेणेकरून एकही पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही, यावरही भर देण्यात यावा.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा भाजपाचे मंडलाध्यक्ष गोकुळ दिघे यांनी व्यक्त केली आहे.









# सह. भाऊसाहेब थोरात संगीत विद्यालयाने जिल्ह्याच्या वैभवात भर - पद्मश्री खेडकर



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

संगमनेर हे अत्यंत सुसंस्कृत व चांगले गाव आहे. त्यामुळे बाहेरून आलेली अनेक माणसे येथे स्थिरावली आहेत. या भूमीने कायम संत आणि कलावंतांचा आदर केला असून, नव्याने सुरू झालेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत विद्यालय हे संगमनेरच्या व जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणारे ठरेल, असा विश्वास पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी व्यक्त केला आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नव्याने अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय संचलित सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेब थोरात होते. तर व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. सुधीर तांबे, न्यायमूर्ती सुमंत कोल्हे, लक्ष्मणराव कुटे, लहानभाऊ गुंजाळ, डॉ. संतोष खेडलेकर, प्रा. बाबा खरात, ड. ज्ञानेश्वर सांगळे, सिताराम वर्पे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. एम. खेमनर, संगीत विद्यालयाचे संचालक प्रा. विनोद राऊत, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी पद्मश्री रघुवीर खेडकर व लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते कला दालनाचा शुभारंभही करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना पद्मश्री रघुवीर खेडकर म्हणाले की, माझी आई स्वर्गीय कांताबाई सातारकर यांची संगमनेरमध्ये संगीत विद्यालय असावे, ही खूप इच्छा होती. आज संगमनेरच्या सुपुत्राच्या हस्ते या विद्यालयाचा शुभारंभ केल्याचा मला खूप आनंद आहे. सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या या गावांमध्ये नव्याने संगीत विद्यालय सुरू होते आहे. यामुळे संगमनेर आणि जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोठी भर पडली आहे.

आपला ५३ वर्षांचा प्रवास संगीतासमवेत आहे. अनेक गावांमधून मंदिरे, शाळा, दवाखाना, रस्ते, याचबरोबर विविध व्यक्तींच्या आजारांच्या मदतीसाठी आपण काम केले. कधीही जाहिरात केली नाही. तमाशा हा अश्लील नाही. त्याकडे चांगल्या नजरेने पहा. आजच्या काळामध्ये चांगले संगीत नाही, संगीत कळत नाही, तरुण पिढीला भान नाही आणि ज्ञान नाही, अशी खंत व्यक्त करताना आगामी काळात जिल्ह्यात व तालुक्यात तमाशा व संगीत महोत्सवाचे आयोजन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, संगमनेरमध्ये सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयामुळे नवे दालन सुरू झाले आहे. संगीताला वयाची, जात, धर्म, पंथाची कशाची अट नाही. निसर्गाने मानवाला आनंद देणारी संगीत ही देणगी दिली आहे. शास्त्रोक्त संगीताचा मोठा वारसा आपल्याला लाभला आहे. सर्वांना एकत्र आणण्याची ताकद संगीतामध्ये आहे. रघुवीर खेडकर यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा संपूर्ण तमाशा विश्वाचा सन्मान करणारा असून, संगमनेरला हा पुरस्कार मिळाल्याचा अभिमान आम्हा सर्वांना असल्याचे ते म्हणाले.

मा. आ. डॉ. तांबे म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे कलासक्त नेतृत्व आहेत. साहित्य, कला, संस्कृती, अशा सर्व गोष्टी त्यांनी संगमनेरमध्ये राबविल्या आहेत. संगमनेरचे हे संगीत विद्यालय जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी महत्त्वाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करताना नुकतेच निधन झालेले स्वर्गीय डॉ. सोमनाथ सातपुते यांनी सह्याद्री संस्थेच्या वाटचालीत मोठे योगदान दिले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी डॉ. संतोष खेडलेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कोमल म्हस्के यांनी तर उपप्राचार्य संजय सुरसे यांनी आभार मानले. यावेळी संगमनेरमधील कलाक्षेत्रातील विविध मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार-दुचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार ठार



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

भरधाव वेगाने, वेगाने जात असलेल्या दुचाकीची समोरून येणाऱ्या कारला समोरासमोर जोराची धडक बसल्याने झालेल्या अपघातामध्ये दुचाकीस्वार जागीच ठार झाला. हा अपघात नाशिक पुणे महामार्गावर कऱ्हे घाटाच्या जवळ घडला.

सध्या नाशिक पुणे महामार्गाचे काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने एकेरी वाहतूक सुरू आहे. मात्र, काम पूर्ण झालेल्या मार्गावर काही वाहन चालक सुसाट वेगाने वाहने चालवत आहेत. दरम्यान, गुरुवारी सकाळी संगमनेरहून नाशिकच्या दिशेने वेगात जात असलेल्या दुचाकीला समोरून येणाऱ्या फॉर्च्युनर गाडीला जोरदार धडक बसली. या धडकेत दुचाकीस्वार तरुणाच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

या अपघात प्रकरणी तालुका पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास तालुका पोलीस करीत आहेत. सदर मयत तरुण जुन्नर तालुक्यातील असल्याचे समजते.

# अहिल्यानगरसह जिल्ह्यात अवकाळी पावसाचा तडाखा



अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्यातील अनेक जिल्ह्यात बुधवारी (दि. १८) सायंकाळी ते रात्री अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांची दाणादाण उडवली. यात नगर जिल्ह्यातील सहा तालुक्यांचा समावेश असून, या ठिकाणच्या ४१ गावांतील ७ हजार ३५२ शेतकर्यांचे साडेतीन हजार हेक्टरवरील पिकांना दणका बसला आहे.

यात अनेक ठिकाणी वादळी वार्यासह गारपीट झाल्याने काढणीच्या टप्प्यावर आलेल्या रब्बी पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वादळी पाऊस व गारपिटीमुळे राहुरी, नेवासा, राहाता, अकोले, नगर आणि पाथर्डीला पूर्वमोसमी पावसाचा तडाखा बसल्याची माहिती जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाच्या अहवालावरून समोर आली आहे.

नगरसह राज्यभर गेल्या आठ दिवसांपासून हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यामुळे किमान शेतकरी सतर्क झाले आणि काढणीला आलेले पिके वेगाने काढण्यात आली. दरम्यान, मागील दोन दिवसांपासून वातावरणात काहीसा बदल झाला. त्यामुळे अचानक झालेल्या बदलामुळे नगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी बुधवारी सायंकाळी ते रात्रीपर्यंत ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाटात दमदार पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी रस्ते, अंगणे व शेतांमध्ये गारांचा सडा पडला.

द्राक्ष, आंबा, डाळींब, टरबूज या फळपिकांसह गहू, हरभरा आणि चारा, यांसारख्या पिकांना मोठा फटका बसला. यावेळी वादळी वार्यामुळे पिके आडवी झाली. अनेक ठिकाणी काढणीला आलेले गहू पीक जमीनदोस्त झाले. कापून ठेवलेला गहू भिजल्याने नुकसान वाढले असून, चार पिक असणारी मका पिक आडवे झाले आहे.

सर्वाधिक फटका बसलेली पिके - गहू, कांदा, मका, भूईमूग, हरभरा, टरबूज, चारापिके, फळपिके, आंबा, डाळींब, संत्रा, बाजारी, भाजीपाला, टोमॅटो, द्राक्षे, या पिकांना सर्वाधिक फटका बसला आहे.

# कळसूबाई शिखरावर गुढी उभारुन मराठी नववर्षाचे उत्साहात स्वागत



अकोले : महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसूबाई शिखर येथे गुढी उभारून मराठी नववर्षाचे पारंपरिक आणि उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. गुढीपाडवा हा चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा होणारा महाराष्ट्रीयन हिंदू नववर्षाचा पहिला दिवस असून, निसर्गातील वसंत ऋतूचे आगमन, शेती हंगामाची सुरुवात आणि विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला विशेष महत्त्व आहे. गेल्या सलग २९ वर्षांपासून घोटी येथील कळसूबाई मित्र मंडळाच्या वतीने ही अनोखी परंपरा जपली जात आहे. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भगीरथ मराडे यांच्या संकल्पनेतून आणि नेतृत्वाखाली गिर्यारोहक दरवर्षी कळसूबाई शिखर सर करून गुढी उभारतात.

यावर्षीही मंडळाच्या गिर्यारोहकांनी पहाटेच शिखर सर केले. उगवत्या सूर्याच्या पहिल्या किरणांवेळी कळसूबाई मातेच्या मंदिरात पंचामृताने दुग्धाभिषेक करून विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर गुढीचे पूजन करून मंदिरासमोर गुढी उभारण्यात आली. या वेळी प्रभू श्रीरामचंद्र, कळसूबाई माता आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात मराठी नववर्षाचे स्वागत करण्यात आले. मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत सर्वधर्म समभावचा संदेश देत गुढीपाडवा आणि रमजान ईदच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. कळसूबाई मित्र मंडळ दरवर्षी नवरात्रीत नऊ दिवस मातेच्या चरणी नतमस्तक होत असून, इंग्रजी नववर्षाचे स्वागतही याच शिखरावर करण्यात येते.

या गुढीपाडवा उत्सवात भगीरथ मराडे, नीलेश पवार, प्रवीण भटाटे, काळू भोर, सुधाकर तांबे, संजय शेवाळे, सुरेश चव्हाण, नामदेव जोशी, भागीरथ म्हसणे, नाना टाकळकर, बाळू आरोटे, अशोक हेमके, सागर पलटणे, ज्ञानेश्वर काळे, देविदास पाखरे, चेतन जाधव, संदीप परदेशी, तसेच इतर गिर्यारोहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आ. अमोल खताळ यांनी कुटुंबीयांसह पारंपरिक पद्धतीने गुढी उभारली



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

गुढीपाडवा सण म्हणजे नवे संकल्प, नवी ऊर्जा आणि आशा घेऊन येणारा प्रेरणादायी क्षण असून, आपल्या समृद्ध संस्कृतीची व हिंदू अस्मितेची आठवण करून देणारा हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे, असे आमदार अमोल खताळ म्हणाले.. या शुभमुहूर्तावर आमदार खताळ यांनी कुटुंबीयांसमवेत साई हर्ष निवास स्थानी पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून नववर्षाचे उत्साहात स्वागत केले. यावेळी आमदार खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, बंधू राहुल खताळ आणि कुटुंबीय उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, गुढीपाडवा हा सण केवळ नववर्षाची सुरुवात नसून, नवीन सकारात्मक विचार आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. समाजातील प्रत्येक घटकाने एकत्र येत आनंद, एकोपा आणि सकारात्मकतेने नववर्ष साजरे करावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले आहे.

# सारोळे पठार येथे बिबट्याच्या हल्ल्यात सात शेळ्या ठार



संगमनेर (प्रतिनिधी)-

तालुक्यातील सारोळे पठार परिसरात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात सात शेळ्या ठार, तर दोन शेळ्या गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. १८) सकाळी आठ वाजेच्या सुमारास घडली आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सारोळे पठार येथील शेतकरी अमित बादशाहा फटांगरे यांनी बुधवारी सकाळी आपल्या शेळ्या नेहमीप्रमाणे खुल्या गोठ्यात सोडल्या होत्या. त्यानंतर ते काही कामानिमित्त घरी गेले असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने गोठ्यात प्रवेश केला. अल्पावधीतच त्याने सात शेळ्यांचा बळी घेतला, तर दोन शेळ्यांना गंभीर जखमी केले.

दरम्यान, काही वेळानंतर फटांगरे हे घरून पुन्हा गोठ्याकडे आले असता, त्यांच्या समोर सर्व शेळ्या मृतावस्थेत पडलेल्या दिसल्या. हे दृश्य पाहून ते घाबरून गेले. त्यानंतर त्यांनी तत्काळ या घटनेची माहिती वन विभागाला दिली. त्यावर वनरक्षक अरुण देशमुख यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

# खांडगाव जिल्हा परिषद शाळेत गोखले शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे एकदिवसीय शिबिर उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर येथील बी.एड. प्रथम वर्ष (द्वितीय सत्र) अभ्यासक्रमांतर्गत 'समुदाय सहभाग' (२०८-अ) आणि 'समाज संपर्क उपक्रम' (२०८-ब) या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडगाव येथे एकदिवसीय विशेष शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शारीरिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या शिबिराचे नियोजन प्रामुख्याने दोन भागात करण्यात आले होते. पहिल्या सत्रात महाराष्ट्र वनविभागाचे वनरक्षक राकेश कोळी साहेब आणि रायड्स फाउंडेशन चे संचालक गणेश जंगम यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन कार्यक्रम पार पडला. तसेच, विद्यार्थ्यांनी गावात पर्यावरण जनजागृती फेरी काढून ग्रामस्थांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले.

दुसऱ्या सत्रात 'स्वच्छ शाळा अभियान' राबवून संपूर्ण शाळा परिसर चकाचक करण्यात आला. तसेच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'शारीरिक शिक्षण दिन' साजरा करण्यात आला, ज्यामध्ये विविध खेळांचे व व्यायामाचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर महाविद्यालयाच्या प्राध्यापिका पंडित मॅडम व वाव्हळ मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यामध्ये बी.एड. प्रशिक्षणार्थींच्या चार गटांनी महत्त्वाची भूमिका बजावली: गट १: आकांक्षा भोर, कावेरी शिर्के व सहकारी, गट २: ज्ञानेश्वर सोनवणे, कुंडलिक भांगरे व सहकारी, गट ३: सुरज ढोबळे, मनोज केदार व सहकारी, गट ४: युवराज कुलकर्णी, दिपक पाळंदे व सहकारी.

कार्यक्रमाला गावाचे सरपंच ड. विकास गुंजाळ आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रायभान गुंजाळ यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी खांडगाव शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंदाने मोलाचे सहकार्य केले. शिक्षण केवळ वर्गात मर्यादित न राहता, ते समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. तसेच, या उपक्रमाचे आभार प्रदर्शन विद्यार्थी शिक्षक शेखर गोडे यांनी केले.

# ॲसिड हल्ला करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करा - आ. खताळ

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील एका गावात सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेला ॲसिड हल्ला अत्यंत संतापजनक आणि दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणातील आरोपीला तातडीने अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या.

आमदार खताळ यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळी भेट देत सविस्तर पाहणी केली व घटनेची माहिती घेतली. आरोपीचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याला अटक करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, सरपंच श्रीनाथ थोरात, ग्रामपंचायत सदस्य सुमित काशीद, गणेश काशीद, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या विद्यार्थिनीवर लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आमदार खताळ यांनी रुग्णालयात जाऊन पीडित मुलीची भेट घेतली व तिच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून माहिती घेतली. डॉक्टरांनी योग्य उपचार सुरू असून मुलीची प्रकृती सुधारत असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांचीही भेट घेत, त्यांना धीर दिला.



जखमी विद्यार्थिनीची घेतली भेट

सहावीत शिकणाऱ्या निष्पाप अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या ॲसिड हल्ल्याची घटना ऐकून मन सुन्न झाले. ही अत्यंत अमानुष व निंदनीय घटना असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांना समाजात अजिबात स्थान नाही. आरोपीची कोणतीही गय केली जाणार नाही आणि त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी, यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे. सध्या पीडित मुलीवर योग्य उपचार सुरू असून, तिच्या उपचारांसाठी आणि पुनर्वसनासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी मदत मिळावी, यासाठी मी प्रयत्नशील आहे. तिच्या कुटुंबाच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे आहोत आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देऊ.

- अमोल खताळ (आमदार)

# लोणीत डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते भावड्या चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

**राहाता (युवावार्ता प्रतिनिधी)–**

**लोणी येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर भावड्या चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण भाजप उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, लोणी पोलीस स्टेशन पीएसआय कैलास वाघ , मा. योगेश आहेर (बंटी), माजी सरपंच अनिल विखे, अभिनेत्री नीता कांबळे, अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित, लेखक अभिनेता ज्ञानदेव शिंदे, अभिनेता पत्रकार ज्ञानेश्वर साबळे, अभिनेता ज्ञानेश्वर मोहिनीराज थोटे, अभिनेता रज्जाक शेख, ज्येष्ठ अभिनेता लेखक आनंदा साळवे, यावेळी उपस्थित होते.**

**भावड्या चित्रपटात भावड्याची भूमिकेत प्रमोद पंडित यांनी आपल्या जीवनावर आधारित हा चित्रपट असल्याने ग्रामीण भागातील चित्रीकरण करण्यात आले आहे. यात अनेक नवोदित कलाकारांना भूमिका करण्याची संधी मिळाली असल्याने प्रेक्षक वर्गात उत्साहाचे वातावरण.**



# संपादकीय...

जागतिक चिमणी दिनानिमित्त

## चिमण्यांचा किलबिलाट हरवू देऊ नका !

दरवर्षी २० मार्च हा दिवस 'जागतिक चिमणी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून जगभरात विविध उपक्रम राबवले जातात, चिमण्यांच्या संवर्धनाबाबत जागृती केली जाते आणि या छोट्याशा पण अत्यंत महत्त्वाच्या पक्ष्याचे अस्तित्व टिकवण्याचा संदेश दिला जातो. एकेकाळी आपल्या अंगणात, गच्चीत, बाल्कनीत सहज दिसणाऱ्या चिमण्या आज मात्र दुर्मिळ होत चालल्या आहेत. पूर्वीच्या ग्रामीण तसेच शहरी जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या या चिमुकल्या पक्ष्यांची संख्या झपाट्याने घटत असल्याचे वास्तव चिंताजनक आहे. चिमणी हा पक्षी भारतातील सर्वसामान्य लोकांना सर्वाधिक परिचित आहे. लहान मुलांच्या गोष्टींपासून ते कवितांपर्यंत चिमणीने नेहमीच आपली जागा टिकवून ठेवली आहे. घरट्यांत किलबिलाट करणाऱ्या चिमण्या, अंगणात दाणे टिपणाऱ्या चिमण्या आणि सकाळच्या शांत वातावरणात ऐकू येणारा त्यांचा मंजुळ आवाज हे आपल्या संस्कृतीचा एक भाग होते. मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे आणि वाढत्या शहरीकरणामुळे हा आवाज आता हळूहळू लुप्त होत चालला आहे. चिमण्यांच्या घटत्या संख्येमागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि सिमेंटच्या जंगलांचा विस्तार हे मोठे कारण आहे. पूर्वी घरांच्या भिंतींमध्ये, छपरांमध्ये किंवा झाडांमध्ये सहजपणे घरटी बांधता येत असत. परंतु आजच्या आधुनिक बांधकाम पद्धतींमध्ये घरट्यांसाठी जागाच उरलेली नाही. परिणामी चिमण्यांना सुरक्षित अधिवास मिळत नाही. यासोबतच वाढती वृक्षतोडही त्यांच्या अस्तित्वासाठी मोठा धोका ठरत आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अन्नाची कमतरता. पूर्वी घरांच्या अंगणात किंवा शेतांमध्ये सहज मिळणारे धान्य आज उपलब्ध राहिलेले नाही. शेतीत रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वाढता वापरही चिमण्यांसाठी घातक ठरत आहे. या रसायनांमुळे अन्नसाखळी बिघडते आणि चिमण्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. याशिवाय शहरांमधील वाढते प्रदूषण आणि मोबाईल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन यांचाही त्यांच्या जीवनावर परिणाम होत असल्याचे अनेक अभ्यासांमध्ये दिसून आले आहे. चिमणी हा केवळ एक पक्षी नसून पर्यावरणीय समतोल राखण्यात तिचा मोठा वाटा आहे. कीटक नियंत्रण, परागीकरण यांसारख्या प्रक्रियांमध्ये चिमण्या महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे त्यांची संख्या कमी होणे म्हणजे पर्यावरणीय संतुलन बिघडण्याची शक्यता वाढणे होय. म्हणूनच चिमण्यांचे संरक्षण करणे ही केवळ भावनिक बाब नसून पर्यावरणाच्या दृष्टीनेही अत्यंत आवश्यक आहे. आजच्या पिढीला चिमणी हा पक्षी प्रत्यक्षात पाहायलाच मिळत नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली, तर भविष्यात चिमणी फक्त चित्रांमध्ये किंवा पुस्तकांमध्येच पाहायला मिळेल. ही वेळ येऊ नये यासाठी आजपासूनच प्रयत्न करणे गरजेचे आहे. केवळ एक दिवस साजरा करून चिमण्यांचे संवर्धन होणार नाही, तर त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. प्रत्येकाने आपल्या परीने काही छोटे उपाय केले, तरी मोठा बदल घडू शकतो. आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत किंवा छपरावर कृत्रिम घरटी ठेवणे हा एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे. या घरट्यांमध्ये चिमण्यांना सुरक्षितता मिळू शकते. तसेच ज्वारी, बाजरी, गहू यांसारखी धान्ये ठेवून त्यांना अन्नाची उपलब्धता करून देता येते. उन्हाळ्याच्या दिवसांत मातीच्या भांड्यात पाणी ठेवणेही अत्यंत आवश्यक आहे. यामुळे चिमण्यांना पाणी मिळते आणि उष्णतेपासून त्यांचे संरक्षण होते. याशिवाय, झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. झाडे म्हणजे पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे वृक्षसंवर्धनाच्या उपक्रमांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. तसेच रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वापर कमी करून पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब केल्यास चिमण्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होऊ शकते. जागतिक चिमणी दिन हा केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित न राहता तो कृतीत उतरवणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे-छोटे बदल केले, तर चिमण्यांचे अस्तित्व टिकवणे शक्य आहे. चिमण्यांचा किलबिलाट पुन्हा आपल्या अंगणात घुमावा, यासाठी आजच पावले उचलणे गरजेचे आहे. निसर्गाशी आपले नाते टिकवून ठेवायचे असेल, चला, 'जागतिक चिमणी दिना'च्या निमित्ताने केवळ जागृतीच नव्हे, तर कृतीचीही शपथ घेऊया आणि आपल्या पुढील पिढीसाठी चिमण्यांचा हा सुंदर वारसा जपून ठेवूया.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थ साक्षरतेचे मार्गदर्शन



नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी) शेअर बाजारातील चढ-उतार किंवा जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे गुंतवणूकदारांनी घाबरून निर्णय घेऊ नयेत, तर संयम ठेवून दीर्घकालीन गुंतवणूक सुरू ठेवावी, असे मत तज्ज्ञ सुनील कडलग यांनी व्यक्त केले.

जय भवानी ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेतर्फे हॉटेल हरियाली येथे 'म्युच्युअल फंडाद्वारे पेन्शनचे नियोजन व सायबर सिक्युरिटी' या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समीर नाईक, पियूष कासट, आदित्य कडलग, पुरुषोत्तम रकीबे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक तुकाराम चव्हाणके यांचा सत्कार करण्यात आला.

कडलग यांनी सांगितले की, बाजार घसरला असताना एसआयपी थांबवू नये. अशा काळात कमी किमतीत जास्त युनिट्स मिळतात, त्यामुळे ही गुंतवणुकीची चांगली संधी असते. इतिहासातही संकटकाळानंतर बाजार पुन्हा वाढल्याचे दिसून आले आहे.

समीर नाईक यांनी सांगितले की, बाजारातील घसरणीचे मुख्य कारण अनिश्चितता असते. अशा वेळी घाबरून गुंतवणूक विकू नये. दीर्घकालीन गुंतवणुकीत संयम ठेवणे गरजेचे आहे. पोर्टफोलिओमध्ये सोन्याचा समावेश केल्यास जोखीम कमी होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

सायबर फसवणुकीबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करत, व्हॉट्सप कॉलवर अटक झाल्याचे सांगितले तरी घाबरू नये, तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असा सल्लाही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरुषोत्तम रकीबे यांनी केले. सूत्रसंचालन सुधाकर जाचक यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिलीप

# कासारा दुमाला गावाचा इतर गावांनी आदर्श घ्यावा - आमदार सत्यजीत तांबे



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कासारा दुमाला येथे आज विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार सत्यजीत तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी यापूर्वी या परिसरातील राम मंदिर यासह इतर तीर्थक्षेत्राच्या विकासाची कामे सुरू केली होती. त्या कामांना अधिक गती देण्यासाठी अतिरिक्त निधी मंजूर आमदार तांबे यांच्या माध्यमातून मंजूर झाला असून त्या कामांचे आज भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना तांबे म्हणाले की, कासारा दुमाला हे संगमनेर शहरालगत वसलेले अत्यंत महत्त्वाचे गाव आहे. २००७ साली जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर या गावाने मला सातत्याने मोठे प्रेम दिले. माझ्या राजकीय प्रवासाची सुरुवात याच गावातून झाली असून त्याची जाणीव आजही मनात कायम आहे आणि भविष्यातही राहील. या गावाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागांना पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यामध्ये येथील ग्रामस्थांनी मोठे योगदान दिले आहे. कासारा दुमाला व कासारवाडी येथील नागरिकांनी नेहमीच तालुक्याच्या विकासासाठी मोठ्या मनाने सहकार्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या विकासकामांमध्ये आपण नेहमीच अग्रेसर राहू.

सध्या गावाचे प्रशासक म्हणून राजेंद्र त्रिभुवन कार्यरत असून, उपसरपंच म्हणून बाळासाहेब वाळके काम पाहत आहेत. तसेच पंचायत समिती सदस्य म्हणून नवनाथ अरगडे यांनीही या भागात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. याचबरोबर ग्रामविकास अधिकारी खैरनार साहेब यांच्या कार्याचेही आमदार तांबे यांनी विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, ग्रामसेवक म्हणून त्यांनी गावात अत्यंत उत्कृष्ट काम केले आहे. गावातील स्वच्छता, वृक्षारोपण, कार्यालयीन शिस्त, कागदपत्रांचे व्यवस्थापन, तसेच सीसीटीव्ही यंत्रणेची अद्ययावत व्यवस्था यामुळे कासारा दुमाला हे गाव आदर्श ठरले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या आहेत.

संगमनेर तालुक्यातील तसेच राज्यातील इतर गावांनी कासारा दुमाला येथे येऊन येथील कामकाजाची पद्धत समजून घ्यावी आणि त्यातून प्रेरणा घ्यावी, असे आसत्यजीत तांबे म्हणाले.


**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397


## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. निकुंज जयंत दातीर, रा. स्वामी समर्थ कॉलनी, नविन नगर रोड, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. -,स. नं.- या ठिकाणी मध्ये दातीर नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. १८/०३/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
सा. बां. विद्युत विभाग, २ रा मजला, ग्रीन बिल्डींग, सा. बां. परिसर, ऊंडवाडी रोड, नाशिक– ४२२००२
दुरध्वनी क्रमांक ०२५३–२५७८०१२
E-mail : elnashik.ec@mahapwd.gov.in

### ई–निविदा सुचना क्रमांक २८/२०२४–२५ दुबार

कार्यकारी अभियंता, सा बां. विद्युत विभाग, नाशिक हे महाराष्ट्र शासनाकडील खालील प्रमाणे रकाना क्रमांक ६ मध्ये नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता 'ब-१' नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता. सा. बां. विद्युत विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. नं | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम | निविदा संचाची फी | ठेकेदाराचा वर्ग | काम पुर्ण करण्याचा |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | Est. No. 4298/2025-26: Providing Renovation To Electrical Installation Work In SDO Office Building At Shrirampur, Dist- Ahilyanagar | 1012888 | १०३०० | ५९०/- | वर्ग ब व त्यावरील | ३ महिने |
| ७ | Est. No. 4299/2025-26: Providing S.R. to Electrical Work In Tahasil Office Building At Newasa, Dist- Ahilyanagar | 1017830 | १०३०० | ५९०/- | वर्ग ब व त्यावरील | ३ महिने |
| ८ | Est. No. 4351/2025-26: ProvidingS.R. to E. I. Work In Tahasil building At Jamkhed, Dist- Ahilyanagar | 1059796 | १०६०० | ५९०/- | वर्ग ब व त्यावरील | ३ महिने |

**निविदेचे वेळापत्रक**

| Stage | Date & Time | Stage | Date & Time |
|---|---|---|---|
| Publish Date | 20.03.2026 10.00 A.M. | Bid Opening Date | 28.03.2026 03.05 P.M. |
| Document Download/ Sale Start Date | 20.03.2026 10.00 A.M. | Document Download/ Sale Start Date | 27.03.2026 03.05P.M. |
| Clarification Start Date | ----- | Pre Bid Date | ----- |
| Bid Submission Start Date | 20.03.2026 10.00 A.M. | Bid Submission End Date | 27.03.2026 03.05P.M. |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. **https://mahatenders.gov.in** (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक कार्यालयातील सुचना फलक.

जा.क्र.काअना/ई-निविदा / ४६७/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा. बां. विद्युत विभाग, २ रा मजला,
ग्रीन बिल्डींग, सा. बां. परिसर,
ऊंटवाडी रोड, नाशिक - ४२२००२.

जिमाका/नगर/जाहि/३०३/२०२६

(सही)
कार्यकारी अभियंता
सा. बां. विद्युत विभाग,
नाशिक.

**CHANGE IN NAME**
I, SHAKIB RAHIMATULLA PATHAN HAVE CHANGED MY OLD NAME SHAKIB RAHEMATULLA PATHAN TO NEW NAME AS SHAKIB RAHIMATULLA PATHAN ADDRESS - GAWTHAN, NIMBHERE, PO. SONGAON TAL. RAHURI, DIST. A. NAGAR (MH) PIN-413711

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME NAMDEV TANHAJI MUTKULE
TO NEW NAME AS NAMDEO TANHAJI MUTKULE
BY AFFIDAVIT NO- 329/2026 DATE 18/03/2026

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME SUVARNA NAMDEV MUTKULE
TO NEW NAME AS SUVARNA NAMDEO MUTKULE
BY AFFIDAVIT NO- 327/2026 DATE 18/03/2026


**WE ARE HIRING** JOIN OUR TEAM
CorelDRAW Ps Ai Id
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**
सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मला, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- २
टेलिकॉलर (महिला)- ३
हेल्पर - ५
7350628728

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत
पोर्णिमा एजन्सी नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर
7588607008
9890636830

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१ (ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक)
अकाउंटंट - ०१ (टॅलीचे ज्ञान आवश्यक)
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079






卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
MALPANI
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# महिलाशक्तीचा उत्साह : गुढीपाडव्याच्या निमित्ताने महिलांची बाईक रॅली उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समिती, चंद्रशेखर चौक संगमनेर महिलाशक्तीच्यावतीने गुढीपाडवा हिंदू नववर्षानिमित्त महिलांची भव्य बाईक रॅली उत्साहात संपन्न झाली. या रॅलीत मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवून हिंदू संस्कृतीप्रती आपला अभिमान व्यक्त केला.

पारंपरिक वेशभूषा, भगवे झेंडे आणि देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. रॅलीमुळे शहरात उत्सवी आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमाचे नियोजन सायली जोशी व सखी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्टरीत्या केले. रॅलीचे व्यवस्थापन, शिस्तबद्ध आयोजन आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला. या रॅलीमुळे महिलांमध्ये एकजूट वाढून सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवा अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या रॅलीचे संपूर्ण नियोजन चंद्रशेखर हिंदू मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले होते. व पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले.

# आरोपीला अटक करून फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवावा – शिवसेना (उबाठा)ची मागणी

## वडगाव पान येथील ॲसिड हल्ला प्रकरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील वडगाव पान येथे अल्पवयीन शाळकरी विद्यार्थिनीवर झालेल्या भ्याड ॲसिड हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने संगमनेर पोलीस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी जोरदार घोषणाबाजी करत आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

जिल्हाप्रमुख सचिन पाराजी कोते पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात, सदर प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवावे, आरोपीला त्वरित अटक करून कडक शिक्षा द्यावी, तसेच त्याला जामीन नाकारावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. याशिवाय पीडित विद्यार्थिनीला तातडीने उत्तम वैद्यकीय उपचार मिळावेत, योग्य नुकसानभरपाई द्यावी आणि तिच्या कुटुंबीयांना आर्थिक व मानसिक आधार देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली.

तसेच शाळा, महाविद्यालये व गावपातळीवर जनजागृती मोहीम राबवून महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात, सिड विक्रीवर कडक नियंत्रण आणावे आणि विद्यार्थी व महिला सुरक्षेसाठी समन्वय समिती स्थापन करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. निवेदन दिल्यानंतर शिवसैनिकांनी वडगाव पान येथील पीडित मुलीच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. या वेळी शिवसेना पक्ष पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी मदत व सहकार्य करेल, अशी ग्वाही जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांनी दिली. या घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त करत उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी, अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेला हा हल्ला मानवतेला काळिमा फासणारा असून अशा नीच प्रवृत्तीला कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे, असे मत व्यक्त केले. तसेच पीडितेला शासकीय मदत मिळावी, अशी मागणी तालुकाप्रमुख भाऊसाहेब हासे, शहरप्रमुख अमित चव्हाण व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. पीडितेला न्याय न मिळाल्यास शिवसेना, युवासेना व महिला आघाडी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या प्रसंगी विविध तालुक्यांतील पदाधिकारी, महिला आघाडीच्या सदस्यांसह शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंदनापुरी येथे मुळगंगा मातेचा यात्रोत्सव सुरु

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

चंदनापुरी -तालुक्यातील येथील जागृत न देवस्थान श्री मुळगंगा मातेच्या न यात्रोत्सवास आजपासून (शुक्रवार ई दि.२०) प्रारंभ होत अहि. न यात्रोत्सवानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे ओयोजन करण्यात आले आहे.

नवसाला पावणारी मुळगंगा माता अशी ख्याती असलेल्या देवीचे दर्शन घेण्यासाठी राज्यातून अनेक भाषिक कायम येत र. असतात. या देवीचा दरवर्षी - मोठ्या उत्साहात यात्रोत्सव होत असतो. यंदाही आयोजन केले असून, शुक्रवारी सकाळी - ८ वाजता होम हवन करून - देवीची महाआरती होणार आहे. - दिवसभरात देवीला नैवेद्य, नारळ, पेढा, ओटी भरण, गुळाची शेरणी

असा प्रसाद चढवला जाणार आहे. रात्री ८ वाजता देवीची छबिना मिरवणूक काढण्यात येणार असून फटाक्यांच्या आतिषबाजीने मिरवणुकीचे स्वागत करण्यात येणार आहे. सनई चौघडा या पारंपरिक वाद्याच्या तालवर निघणाऱ्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार आहे. यानंतर मारुती मंदिरासमोर फटाक्यांची आतिषबाजी होऊन मिरवणुकीची सांगता होणार आहे. त्यानंतर १० वाजता महाराष्ट्राचा सुप्रसिद्ध मंगला बनसोडे सह नितीनकुमार यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता हजेरीचा कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ४ वाजता कुस्त्यांचा जंगी हगामा होणार आहे. तरी भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटी व देवस्थान समितीच्यावतीने करण्यात आले आहे. यात्रोत्सव निमित्ताने मुळगंगा मातेच्या मंदिरासह गावातील सर्व मंदिरे व विविध संस्था यांच्यावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# संगमनेर ॲसिड हल्ला प्रकरण गंभीर

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची पोलीस प्रशासनाला कारवाईच्या सूचना



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - संगमनेर (जि. अहिल्यानगर) येथे १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या ॲसिड हल्ल्याच्या अत्यंत गंभीर घटनेची विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दखल घेतली असून या प्रकरणात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी कठोर आणि तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांना दिले आहेत.

दि. १७ मार्च २०२६ रोजी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित प्रकरणी संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास जलदगतीने पूर्ण करण्याची गरज डॉ. गोऱ्हे यांनी अधोरेखित केली आहे.

डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, आरोपीचा शोध घेण्यासाठी आंतरजिल्हा विशेष तपास पथक गठित करून वैज्ञानिक व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास करावा. घटनास्थळावरील पंचनामा, फॉरेन्सिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल रेकॉर्ड (उउ्ऴ) आदी पुरावे तत्काळ संकलित करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहेत. तसेच आरोपीची ओळख पटविण्यासाठी टेस्ट आयडेंटिफिकेशन परेड घेणे आणि पीडितेचा जबाब दंडाधिकाऱ्यासमोर नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणात वैद्यकीय अहवाल जखमांची तीव्रता आणि हल्ल्याचा हेतुपुरस्सरपणा सिद्ध करणारे पुरावे भक्कमपणे सादर करण्यावरही त्यांनी भर दिला आहे. प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून अनुभवी विशेष सरकारी वकील नेमण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सुचविले आहे.

याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाच्या Laxmi Vs. Union of India या प्रकरणातील निर्देशांनुसार ॲसिड विक्री व साठ्याचे काटेकोर नियमन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.

# कै. गं. भा. अनुसया दगडू फापाळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली



॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

## प्रेमळ वात्सल्यसिंधू - आमच्या आज्जी

डोक्यावर पदर घेणारी, प्रत्येकाला आदर देणारी,
जिच्या अंगाखांद्यावर, नातू, पणतू थिरकली,
जिच्या अंतरंगात नेहमी, मायाच झिरपली,
अशी शेवटची पिढी, आज आमच्यातून हरपली...

माणूस जन्माने नाहीतर कर्माने मोठा होत असतो, केवळ शिक्षणानेच नव्हे तर अनुभव व कष्टाने माणूस यशस्वी होऊ शकतो असे अनेक संत महात्म्यांनी सांगून ठेवले आहे. संत महात्म्यांच्या या पवित्र वाणीप्रमाणेच कै. गं. भा. अनुसया दगडू फापाळे यांनी आयुष्यभर सत्कर्म केले. आज या आमच्या प्रिय आजीला आपल्यातून जाऊन दहा दिवस होत आहे. त्यांचे संपूर्ण जीवन हे इतरांसाठी आदर्श व प्रेरणादायी आहे. आमच्या आजीच्या दशक्रिया विधीच्या निमित्ताने त्यांना भावपूर्ण आदरांजली.

सन १९३० मध्ये संगमनेर तालुक्यातील कुरकुंडी येथील प्रतिष्ठित शेळके परिवारात आजीचा जन्म झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री शिक्षणाची गंगा कुरकुंडी सारख्या ग्रामीण भागात पोहोचली नव्हती. त्यामुळे आजीला शिक्षण मिळाले नाही. परंतु आई- वडिलांनी केलेले उत्तम संस्कार यालाच आज्जीने शिक्षण मानले. त्यांचे लग्न अकोले तालुक्यातील जाचकवाडी येथील शेतकरी कुटुंबातील दगडू भिमाजी फापाळे म्हणजेच आमच्या बाबांशी झाले. बाबांची परिस्थिती नाजूक जरी असली तरी अशा परिस्थितीमध्ये आज्जीने पतीच्या खांद्याला खांदा लावून संसारात त्यांना मोलाची साथ दिली. कष्टालाही सुख मानत त्यांनी जीवनाची वाटचाल सुरू केली. त्यांच्या या सुखी संसारात कारभारी, तानाजी, रामदास अशा त्रिमूर्तींचा जन्म झाला. गरीबीमुळे व शिक्षणाअभावी आपल्यावर जी कष्ट उपासन्याची वेळ आली ती आपल्या मुलांवर येऊ नये म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या मुलांकडे लक्ष दिले.

आजीचे सासू - सासरे तीन दिर, जावा, मुले, पुतणे, सुना, नातवंडे अशा या सर्व एकत्रित कुटुंबाचा आज्जीने अतिशय प्रेमाने सांभाळ केला. परिवाराची देखभाल करणे त्याचबरोबर दारी असलेली गुरेढोरे, शेतीवाडी बघणे इत्यादी सर्व जबाबदाऱ्या त्यांनी अतिशय जिद्दीने व प्रेमाने हसत खेळत जीवनभर पार पाडल्या... आपल्या तीनही मुलांचे लग्न आजीने अतिशय थाटामाटात करून दिले. आपल्याला लेक नाही म्हणून आपल्या दोन मुलांना तर त्यांचे मोठे भाऊ कै. सदाशिव दगडू शेळके यांच्याच मुली सुमन व सरिता सुना म्हणून करून आणल्या आणि लेकीप्रमाणेच त्यांना जीव लावला. सुनांनी देखील आजीचा आईप्रमाणेच आयुष्यभर सांभाळ केला. लेक नसल्याची खंत आजीला कधीच त्यांनी जाणवून दिली नाही. सून सरिता यांनी आजीची शेवटपर्यंत घेतलेली काळजी, योग्य आहार, वेळोवेळी केलेला उपचार यामुळेच आजी तब्बल ९६ वर्षापर्यंत निरोगी आयुष्य जगू शकली. या सुखी संसाराचा गाडा आज्जीनी आयुष्यभर कधीही कुणाला न दुखवता न भांडता अतिशय प्रेमाने चालवला. कधीही कोणाला न रागवणे, चुक झाली तरी त्याला माफ करणे, समजून सांगणे हा आजीचा मूळतः स्वभाव. घरात आलेला पाहुणा उपाशी जाणार नाही याची त्या कायम दक्षता घ्यायच्या. सर्वांशी आपुलकीने बोलणे, आस्थेवाईकपणे विचारपूस करणे हा त्यांचा स्थायीभाव.

लहानपणापासून आजींच्या सहवासात वाढण्याचे भाग्य आम्हाला लाभले. त्यांच्या रामायण, महाभारतातील गोष्टी, अभंग त्यांच्या खडतर अनुभवातून मिळणारे धडे आणि त्यांच्या प्रेमळ शब्दांनी खऱ्या अर्थाने आमचे बालपण समृद्ध केले. संकटाच्या वेळी त्यांनी दिलेला धीर, त्यांच्या मायेची ऊब आजही मनात ताजी आहे. आजींच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, संयम आणि कणखरपणा यांचा सुंदर संगम तर होताच पण आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले तरी त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि डोळ्यांतील प्रेम हे आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहिले. आम्ही त्यांचे नातू म्हणून स्वतःला खूप भाग्यवान समजतो. त्यांनी आम्हाला केवळ प्रेमच दिले नाही तर चांगले माणूस कसे बनायचे हेही शिकवले. त्यांच्या प्रत्येक शिकवणीचा आणि आठवणींचा ठेवा आमच्या आयुष्यात सदैव जपला जाईल.

आपल्या मुलांनी, नातवंडांनी खूप शिकावे मोठे व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आजीचे संस्कार, शिस्त यामुळेच आजीचे मोठे चिरंजीव कारभारी यांचा ४५ वर्षापासून काचेच्या व्यवसायात मोठा नावलौकिक आहे. दुसरे चिरंजीव रामदास हे आपली संपूर्ण शेतीवाडी चांगल्या प्रकारे बघतात. आजीचे नातू योगेश हे देखील काचव्यवसायात कार्यरत आहेत. वैभव हे मार्केटिंग क्षेत्रात तर डॉ सागर हे वैद्यकीय, शिवप्रबोधन व अभिनय क्षेत्रात महाराष्ट्रभर कार्यरत आहे. आजीच्या नाती अर्चना, नीलम, सोनम याही प्रतिष्ठित घरात दिल्या असून नातसुना अनिता या यशोमंदिर पतसंस्थेत, रेशमा या सीए क्षेत्रात तसेच धनश्री या एमडी डॉक्टर आहेत.

केवळ शिक्षणामुळे यशस्वी होणार नाही तर त्यांच्यावर योग्य संस्कार सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन आजीने आम्हा सर्वांवरच उत्तम संस्कार केले. मुलांनी खूप शिकावे, मोठे व्हावे आपले व आपल्या कुळाचे नाव मोठे करावे अशी त्यांची तळमळ होती. या तळमळी पोटी अपार कष्ट करून आम्हा सर्व नातवंडांना अतिशय प्रेम देऊन आमच्या भविष्याकडे त्यांनी लक्ष दिले. आमच्या आजीने जीवनात परिस्थितीशी संघर्ष करत एक यशस्वी पत्नी, यशस्वी माता व सर्वांना आधार देणारी आज्जी या सर्व भूमिका उत्तम रित्या वठवल्या. परिस्थितीमुळे हतबल न होता व न डगमगता जीवनात यश मिळविता येते हा आदर्श त्यांनी इतरांपुढे प्रस्थापित केला. जीवनात सुखाबरोबरच दुःखाचेही दिवस माणसाच्या वाटेला येतात असेच दिवस आजीच्याही वाटेला आले. आजीचे मधले चिरंजीव तानाजी, नातू जयेश आणि पती दगडू यांचे अकाली झालेले निधनाने त्यांच्या मनावर खोलवर आघात केला. परंतु न खचता त्यांनी जीवनाचा संघर्ष सुरूच ठेवला.

दिवसामागे दिवस जात होते, वय वाढत चालल्यामुळे शेवटचे काही दिवस ती अंथरुणातच खिळून होती, पण तिची स्मृती शेवटपर्यंत शाबुद होती. शेवटच्या श्वासापर्यंत तिला जुन्या काळातील सर्व घटना जशाची तशा आठवत होत्या. दहा-बारा दिवसांपूर्वी ती अत्यवस्थ झाली. सतत खूप बडबडणारी ती एकदम बोलायची बंद झाली. त्यावेळी तिच्या जीवनाचा एक मोठा पट क्षणार्धात डोळ्यासमोरून सरकुन गेला. ती गेल्याचं दुख नव्हतं पण ती यापुढे आपल्याला कधीच दिसणार नाही, आपुलकीने कधीच हाका मारणार नाही या दुखाने आम्ही खूपच व्याकुळ झालो.

आज आज्जी आपल्यात नाहीत, पण त्यांची आठवण, त्यांनी घालून दिलेले संस्कार आणि दिलेली माया आमच्या हृदयात कायम जिवंत राहील. त्यांच्या जाण्याने आमच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही. अशा या आमच्या आजीचे सर्वांना हवेहवेसे वाटणारे व इतरांपुढे सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व गुरुवार २१ मार्च रोजी आपल्यातून अनंताच्या प्रवासाला निघून गेले. त्यांच्या या जाण्याने केवळ फापाळे परिवारावरच दुःखाचा डोंगर कोसळला नाही तर त्यांना ओळखणाऱ्या त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वांवरच तो कोसळला आहे.

आजी तुझी उणीव भविष्यात आम्हाला प्रत्येक क्षणी जाणवेल, तुझे प्रेम, तुझा आशीर्वाद आणि तुझी आठवण आम्हाला जीवनात सदैव मार्गदर्शन करत राहील, यात शंका नाही. एक कर्तव्य संपन्न व प्रेमळ व्यक्तिमत्त्वाच्या धनी असलेल्या आजी कै. ग. भा. अनुसया दगडू फापाळे यांना जड अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली.

आजी तुझे उपकार कुठे फेडशी जीवा,
हाताची केली झोळी नेत्राचा केला दिवा,
आजी आजी करतो आजी दूरल्या देशात,
अशी जन्मली खडीसाखर उसात...

- डॉ. सागर फापाळे (नातू)

सौ. कांचनताई बाळासाहेब थोरात (जिजी)
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!
- शुभेच्छुक -
युवा उद्योग समुह, संगमनेर

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर..................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला; आरोपीचे रेखाचित्र जारी

## माहिती देण्याचे पोलिसांचे आवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वडगावपान परिसरात घडलेल्या अमानुष ॲसिड हल्ल्याच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. अवघ्या १३ वर्षांच्या शाळकरी मुलीवर अज्ञात इसमाने ॲसिडसदृश्य द्रव फेकून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती.

पीडित विद्यार्थिनी कु. ईश्वरी संजय डहाळे (वय १३) ही मंगळवारी सकाळी शाळा सुटल्यानंतर महादेव मळा परिसरातील कच्च्या रस्त्याने सायकलवरून घरी जात असताना हा प्रकार घडला. हाडकीचा ओढा परिसरातून जात असताना दुचाकीवरून आलेल्या अंदाजे ३२ ते ३५ वयोगटातील अज्ञात इसमाने तिला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले. त्यानंतर त्याच्याकडे असलेल्या बाटलीतील ॲसिडसदृश्य द्रव तिच्या चेहऱ्याच्या उजव्या बाजूस फेकून आरोपी घटनास्थळावरून फरार झाला.

या भीषण हल्ल्यात ईश्वरी गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने लोणी (ता. राहाता) येथील प्रवरा मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तिच्यावर जनरल फिजिशियन, प्लास्टिक सर्जन आणि नेत्रतज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. १२६/२०२६ अन्वये बी.एन.एस. कलम १२४(१), १२६(२) प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेच्या आईने याबाबत फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाची सूत्रे हाती घेतली. आरोपीचा शोध घेण्यासाठी दहा विशेष पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये गुन्हे शोध पथक (अहिल्यानगर), फॉरेन्सिक युनिट (संगमनेर), सायबर टीम तसेच संगमनेर शहर व तालुका पोलीस यांचा समावेश आहे. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या आधारे तपास वेगाने सुरू आहे.

तपासादरम्यान साक्षीदारांनी दिलेल्या माहितीनुसार संशयित आरोपीचे रेखाचित्र तयार करण्यात आले असून ते सार्वजनिक करण्यात आले आहे. या रेखाचित्रातील व्यक्तीबाबत कोणाकडेही खात्रीशीर माहिती असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या अमानुष घटनेविरोधात वडगावपान परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत रस्त्यावर उतरून निषेध नोंदवला. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

पोलीस प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, आरोपीला लवकरात लवकर अटक करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे

# गुढीपाडव्याच्या दिवशी विचित्र अपघात दूध टँकरची पिकअपला जोरदार धडक

## पिकअप दुकानात शिरली, दोघे गंभीर जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील मालदाड-नान्नज रस्त्यावर गुढीपाडव्याच्या पवित्र दिवशी सकाळी एक भीषण अपघात घडला. राजहंस दूध कंपनीचा टँकर चालकाला अचानक फिट (झटका) आल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टँकर थेट पिकअप गाडीवर जाऊन आदळला. या जोरदार धडकेत मोठे नुकसान झाले असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, राजहंस दूध टँकर (क्रमांक एमएच १७ टी ३५६८) हा नान्नज, पारेगाव, काकडवाडी परिसरात दूध संकलनासाठी जात होता. दरम्यान, नान्नज गावातील एका मंदिराजवळ चालकाला अचानक फिट आल्याने टँकरवरील ताबा सुटला. अनियंत्रित झालेला टँकर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पिकअप (क्रमांक एमएच १७ बीडी ३५८३) वर धडकला.

त्या वेळी पिकअपमधून किराणा माल एका दुकानात उतरवला जात होता. धडकेचा जोर इतका होता की पिकअप गाडी थेट दुकानात घुसली. त्यामुळे दुकानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून परिसरात एकच खळबळ उडाली.

या अपघातात म्हसू शिंदे (वय ६० वर्ष) आणि एक लहान मुलगी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. सदर अपघात सकाळीच झाल्याने दुकानात ग्राहकांची गर्दी देखील होती. वेळीच सावध झाल्याने या अपघातातून काही जण थोडक्यात वाचले. अन्यथा मोठा अनर्थ देखील घडला असता. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळीच ही घटना घडल्याने परिसरात मोठी गर्दी जमली होती. अपघातानंतर नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

# माणुसकीला काळीमा फासला

## चिमुरडीचा विनयभंग, पोक्सो दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ८ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना बुधवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास संगमनेरच्या एका मळ्यात घडली. पीडित मुलगी ही आपल्या ओळखीच्या एका घराकडे खाऊ आणण्यासाठी जात असताना, आरोपीने तिचा पाठलाग केला. आरोपीने निर्जन ठिकाणी मुलीचा हात पकडून तिला ओढत नेले आणि तिचे कपडे काढून तिचा विनयभंग केला.

या घटनेनंतर पीडित मुलीच्या ३६ वर्षीय मातेने तत्काळ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७८ आणि बाल लैंगिक अपराध संरक्षण कायदा कलम ८ व १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन वाकडे हे करत आहेत.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25